जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३६५ दिनांक - १६/०५/२०२३**

## पीसीबी,गुन्हे शाखा,पुणे शहर अंतर्गत एमपीडीए कारवाई

### विश्रांतवाडी पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई

पुणे शहरातील विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **नितेश सुनिल सदभैय्या,वय- २१ वर्षे,रा.स.नं.१०६,कतारवाडी,भैरवनाथ मंदिराशेजारी,येरवडा,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे.त्याने त्याच्या साथीदारांसह विश्रांतवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत **लोखंडी कोयता,लोखंडी फायटर,लोखंडी रॉड** या सारख्या जीवघेण्या हत्यारांसह **खुनाचा प्रयत्न,घातक हत्याराने दुखापत करणे,दंगा करणे,बेकायदा हत्यार बाळगणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०४ गुन्हे दाखल आहेत.त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती.तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए.कायद्यान्वये नागपूर मध्यवर्ती कारागृह,नागपूर येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.**नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.दत्तात्रय भापकर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्रांतवाडी पो.स्टे.पुणे शहर व श्रीमती सुरेखा वाघमारे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणाया व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे.**पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही १५ वी कारवाई असून,**यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.